दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३२०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०१ जुलै २०२५







# ठाकरे बंधू एकत्र आल्यास मविआ फुटणार?

## महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा गेम होणार ?

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.३०, मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. दोन्ही बंधू एकत्र आले तर आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेष म्हणजे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेश चेन्नीथला यांनी याबाबत महत्त्वाचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीत फूट पडणार की काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. विशेष म्हणजे राज ठाकरे यांची उत्तर भारत आणि दक्षिण भारत ही भूमिका मान्य नाही. भारत एक आहे, अशी बोलकी प्रतिक्रिया चेन्नीथला यांनी दिली आहे. त्यामुळे आगामी स्थानिक



स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस आणि ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वबळाची भूमिका घेणार का? ते पाहणं आता महत्त्वाचं आहे.

**रमेश चेन्नीथला नेमकं काय म्हणाले?**

राज ठाकरे यांची भूमिका ही आम्हाला अजिबात मान्य नाही. आम्ही त्यांच्या भूमिकेशी सहमत नाही. उत्तर भारत आणि दक्षिण भारत असं काही नाही. भारत एक आहे. उत्तर भारतीयांना काँग्रेस पक्षाने खूप मजबूत केलं आहे. खूप संधी देखील दिल्या आहेत. काँग्रेस आपल्या विचारधारांना घेऊन चालणार पक्ष आहे, अशी भूमिका रमेश चेन्नीथला यांनी मांडली आहे. राज ठाकरे जर उद्धव ठाकरेंसोबत आले तर? असा प्रश्न पत्रकारांनी रमेश चेन्नीथला यांना विचारला. त्यावर त्यांनी तेव्हाचं तेव्हा पाहू. अजून काही निश्चित नाही की ते दोन्ही एकत्र येतील, अशी प्रतिक्रिया रमेश चेन्नीथला यांनी दिली.

गाड्यांचा ताफा मुंबईच्या दिशेने, २ हजार कार्यकर्त्यांसह कुणाल पाटलांचा भाजपमध्ये प्रवेश होणार!

मुंबई महापालिकेची निवडणुकीत स्वबळावर लढायचं की एकत्र लढायचं याबाबत ७ तारखेला मुंबईत पक्षाची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत निर्णय घेण्यात येईल, अशी प्रतिक्रिया रमेश चेन्नीथला यांनी दिली. प्रत्येक कार्यकर्त्याला स्वतंत्र निवडणूक लढावं, असं वाटतं. कारण ही स्थानिक पातळीवरची निवडणूक आहे, असंदेखील रमेश चेन्नीथला म्हणाले.

---

## 'डबल ए प्लस स्टेबल' मानांकन मिळवणारी 'नवी मुंबई महापालिका' भारतात एकमेव

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.३०, नवी मुंबई :** इंडिया रेटींग अँड रिसर्च (फिच) या राष्ट्रीय स्तरावरील अर्थविषयक मान्यताप्राप्त संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी विविध संस्थांचे पत मानांकन जाहीर करण्यात येते. यामध्ये मागील १० वर्षांप्रमाणेच याही वर्षी इंडिया डबल ए प्लस स्टेबल (एए+ स्टेबल) हे सर्वोत्तम पत मानांकन नवी मुंबई महानगरपालिकेस सन २०२४-२५ करीता जाहीर झाले असून अशाप्रकारे आर्थिक सक्षमतेचे डबल ए प्लस मानांकन सातत्याने अकरा वर्षे मिळविणारी नवी मुंबई ही देशातील एकमेव महानगरपालिका आहे.

देशातील निवासयोग्य शहरांमध्ये आघाडीवर असणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेने नागरिकांसाठी पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधांच्या दर्जाकडे बारकाईने लक्ष देत नेहमीच दूरगामी दृष्टीकोन राखला आहे. महसूलविषयक जमा व खर्चाच्या बाबींकडेही काटेकोर लक्ष दिले आहे. जमा-खर्चाचा योग्य ताळमेळ राखण्याकडे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे बारकाईने लक्ष असून त्याला मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे यांच्या नियंत्रणाखाली संपूर्ण लेखा विभागाची सुयोग्य साथ लाभत आहे. त्यामुळेच हे सर्वोत्तम आर्थिक पत मानांकन याही वर्षी लाभले आहे. अशाप्रकारे सातत्याने पत मानांकन मिळविणे ही सर्व नवी मुंबईकर नागरिकांसाठी अभिमानाची गोष्ट असून या मानांकनाबद्दल महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे



यांनी समाधान व्यक्त केले आहे.

मागील आर्थिक वर्षात कर वसूलीची चांगली कामगिरी करण्यात आल्याने नवी मुंबई महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सक्षम राहिलेली आहे. या कालावधीत थकीत मालमत्ताकर धारकांना दिलासा देणारी 'मालमत्ताकर अभय योजना' प्रभावीपणे राबविण्यात आली. त्यालाही नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला. मालमत्ताकर विभागाने आत्तापर्यंतचे सर्वोच्च २६ कोटीहून अधिक करवसूली केली. इतरही विभागांनी त्यांचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले. विविध करांद्वारे प्राप्त होणाऱ्या निधीमधूनच नागरी सेवासुविधांची पूर्तता करण्यात येत असल्याने नवी मुंबईकर नागरिकांना अधिक उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देणे शक्य झाले. 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण' तसेच माझी वसुंधरा अभियान यामध्येही नवी मुंबई महानगर पालिकेने उत्तम कामगिरीचे सातत्य राखले आहे.

महापालिका आयुक्तांमार्फत महानगरपालिकेच्या आर्थिक नियोजनाकडे बारकाईने लक्ष दिले जात आहे. करवसूलीमध्ये चांगली कामगिरी आणि नागरी सुविधांच्या योग्य बाबींवरच खर्च असे सुयोग्य धोरण अवलंबिल्याने तसेच ई गव्हर्नन्स ची प्रभावी अंमलबजावणी करीत ई ऑफिस कार्यप्रणाली राबविल्याने कामकाजात गतिमानतेसोबतच पारदर्शकता आलेली आहे. लेखा विभागामार्फत 'होस्ट टू होस्ट' प्रणालीद्वारे देयके व रक्कमा अदायगी होत असून महानगर पालिकेचे कोणतेही पेमेंट पुरवठादाराच्या थेट बँक खात्यात जमा होत आहे. यामधून कामकाजात पारदर्शकता आली आहेच, शिवाय कामकाजही पेपरलेस व गतीमान झाले आहे. कंत्राटदारांची अदायगी व अधिकारी, कर्मचारी यांचे पगारही वेळेवर होत आहेत. त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेकडे महाराष्ट्र शासन, एम.एम.आर.डी.ए., एम.आय.डी.सी. यापैकी कोणाचेही कर्ज, व्याज अथवा कर थकीत नाही.

या साऱ्यांचे फलित म्हणजे हे पत मानांकन असून यापुढील काळातही महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जमेच्या तुलनेत नागरिकांना उपयोगी अशा नागरी सुविधांवरील योग्य खर्च ही पध्दत कायम राखली जाणार आहे. त्यामुळे इंडिया रेटींग अँड रिसर्च या नामांकीत संस्थेमार्फत इंडिया एए+ स्टेबल हे सातत्याने अकराव्या वर्षी लाभलेले पत मानांकन कायम राखण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका सज्ज आहे.

---

## महामार्गावरील अतिक्रमणे काढा तसेच अपघातस्थळी रूग्णवाहिका तातडीने पाठवा

### खा.बजरंग सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या सुचना...

**अक्षराज : शिवाजी औसेकर**
**दि.३०, बीड :** जिल्ह्यात विविध रस्त्यावर ब्लॅकस्पॉट आहेत. शिवाय राष्ट्रीय महामार्गावर अतिक्रमणे वाढत आहेत. यामुळे अपघात होत असून अपघात टाळण्यासाठी अतिक्रमणे काढा आणि अपघातस्थळी तातडीने रूग्णवाहिका पाठवा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १२.३० वाजता जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आयोजीत केली होती. यावेळी खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान आणि विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, अपघाताचे प्रमाण हे सायंकाळी व पहाटे जास्त असते. या दरम्यान आपल्या यंत्रणेने सतर्क राहायला हवे. जिल्ह्यात अनेक असे अतिक्रमण आहेत, ज्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. ते अतिक्रमण काढण्याचा सूचना केल्या. विशेषत: गेवराई तालुक्यातील गढी भागात अनेक वेळा अपघात झालेले आहेत.

त्या ठिकाणी तांत्रिक सुधारणा करण्याच्या सूचना केल्या. जिल्ह्यात कोठेही अपघात झाला तर त्या ठिकाणी रुग्णहिका तात्काळ मिळावी, यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांना सूचना केल्या. माजलगाव तालुक्यातील सादोळा



येथील पुलाचे काम तातडीने सुरू करावे असे म्हणत, लोकांची अडवणूक होणार नाही, याची काळजी घ्या, असा सल्लाही यावेळी त्यांनी दिला. दरम्यान, तेलगाव या ठिकाणी रस्त्याचे पाणी व्यवस्थित न काढल्यामुळे त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहेत. ते दुरुस्ती करण्यात यावे. राष्ट्रीय महामार्ग खात्याचे स्वतंत्र ऑफिस बीड जिल्ह्यात होण्यासाठी आर.ओ ऑफिसला प्रस्ताव पाठवा, अशा सुचना देखील दिल्या. राष्ट्रीय महामार्ग संस्थेचे स्वतंत्र कार्यालय बीडला झाल्यास जिल्ह्यातील कामे वेळेत मार्गी लागतील, अशी अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली. खरवंडी-मादळमोही-पाडळसिंगी-गढी- माजलगाव या महामार्गावरील तालखेड फाटा, शृंगारवाडी फाटा व इतर सर्व ठिकाणी रस्ते कामाचा दर्जा अत्यंत खराब असल्यामुळे अपघात होत असले बाबत तक्रारी होत आहेत. भविष्यात अपघात होऊ नयेत यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात, असेही म्हटले.

---

## थोडक्यात

### सामुदायिक आरोग्य शिबिराचे नियोजन



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**
**दि.३०, ठाणे :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या समन्वयाने व कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे ,यांच्या पुढाकाराने,दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी ठाण्यात मोफत सामुदायिक आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात येते. या वेळी हे शिबिर सेंट झेवियर्स हायस्कूल, चितळसर मानपाडा, घोडबंदर रोड येथे आयोजित केले गेले होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदीच्या प्रेरणेने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात सर्वत्र अशी आरोग्य शिबिरे भरवण्यात येत आहे.

ठाण्यात आमदार निरंजन डावखरे .यांच्या नेतृत्त्वाखाली हे तिसरे शिबिर अत्यंत यशस्वीरीत्या राबवण्यात आले. जवळपास ३७० नागरिकांनी ह्या शिबिराद्वारे रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी, चिकित्सा यांसह तज्ञ डॉक्टर्सकडून रोग निदान, शिबिरानंतर आवश्यक रुग्ण शस्त्रक्रिया, रक्त व लघवी चाचणी व ई.सी.जी. तपासणी इत्यादी विनामूल्य सुविधांचा लाभ घेतला,

तसेच केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी आयुष्मान भारत योजनेद्वारे गरीब आणि वंचित नागरिकांना ₹५ लाख पर्यंतचे मोफत रुग्णालयीन उपचार प्रदान करण्याकरिता आयुष्मान कार्डचे वितरण करण्यात आले.

सकाळी ०८:०० वाजल्यापासून चालू असलेल्या या शिबिराला ठाणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. नागरिकांनी अत्यंत समाधानाने ह्या स्तुत्य उपक्रमकरिता मुख्यमंत्री सचिवालयाचे आभार मानले.

या शिबिरास आमदार संजय केळकर, भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप लेले, माजी. नगरसेवक मनोहर डुंबरे, माजी. नगरसेविका स्नेहा आंब्रे,नगरसेविका अर्चना मनेरा, रमेश आंब्रे, सूरज दळवी, स्नेहा पाटील, निलेश पाटील, जितेंद्र मढवी, ज्योती ठाकूर, राम ठाकूर, महेश ताजने, अर्चना पाटील यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### विक्रोळी पार्क साईट शाळेची यशस्वी घोडदौड



**अक्षराज : प्रभाकर हजारे**
**दि.३०, मुंबई :** राज्य व राष्ट्रीय स्तरावर नेहमीच आपल्या यशाचे वादळ उठणारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची शाळा म्हणजे विक्रोळी पार्क साईट शाळा नुकत्याच संपन्न झालेल्या महापौर क्रीडा शिष्यवृत्ती वितरण समारंभात या शाळेच्या तब्बल बारा विद्यार्थ्यांना बहात्तर हजार रुपये शिष्यवृत्ती मिळाल्याने विद्यार्थी व शाळा आणि मार्गदर्शक शिक्षक यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की विक्रोळी पश्चिम येथील विक्रोळी पार्क साईट या शालेय इमारतीत विविध माध्यमाच्या शाळा कार्यरत आहेत.येथील विद्यार्थी अतिशय होतकरू व मेहनती असल्याने आदर्श शारीरिक शिक्षण शिक्षिका प्रिया पेंडुलकर यांच्या उत्तम मार्गदर्शनाखाली 'स्पीड बॉल' स्पर्धेत या शाळेच्या विद्यार्थ्यांनी अफलातून खेळी करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. जिल्हा स्तर, विभागीय स्तर आणि राज्यस्तवर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. त्यामुळे शाळेचे व पर्यायाने मुंबई महानगरपालिकेचे नाव उज्वल झाले. मार्गदर्शक शिक्षिका प्रिया पेंडुलकर यांची शिक्षण विभागात मेहनती शिक्षिका म्हणून ख्याती असून त्या प्रत्येक खेळात विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन करतात. त्यांना सहकार्य लाभले ते वरीष्ठ शारीरिक शिक्षण शिक्षक गौतम कांबळे यांचे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक विभागाचे एकूण २४ विद्यार्थी राज्यस्तरावर गेले असून त्यापैकी एकट्या विक्रोळी पार्क साईट शाळेचे १२ विद्यार्थी आहेत.या यशस्वी विद्यार्थ्यांपैकी प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या सहा विद्यार्थ्यांना प्रत्येकी रोख रक्कम रुपये ५ हजार व राष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी संधी मिळाली. तर द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना प्रत्येकी८ हजार रुपये आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या ३ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांचा धनादेश शिक्षणाधिकारी कार्यालय करी रोड मुंबई येथील सभागृहात उपशिक्षणाधिकारी किर्तीवर्धन किरतकुडवे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

एन वॉर्ड च्या प्रशासकीय अधिकारी वीणा सोनवणे यांचा आणि शाळेचे मुख्याध्यापक कैलास सरोदे यांचा या यशामध्ये सिंहाचा वाटा आहे. प्रशासकीय अधिकारी वीणा सोनवणे या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नेहमीच क्रीडा विषयक बाबी व इतर काही तांत्रिक बाबींसाठी मार्गदर्शन आणि मानसिक पाठबळ देतात. तर मुख्याध्यापक कैलास सरोदे हे देखील विद्यार्थ्यांना वेळोवेळी काय हवं/नको ते पाहतात.

विद्यार्थ्यांच्या या अप्रतिम यशाबद्दल एन वॉर्ड च्या प्रशासकीय अधिकारी वीणा सोनवणे, विभाग निरीक्षक व मुख्याध्यापक कैलास सरोदे, शा.शि. चे कनिष्ठ पर्यवेक्षक सुभाष पाटील, हिंदी शाळेचे मुख्याध्यापक राय सर, मराठी शाळेच्या इंचार्ज कदम मॅडम यांच्यासह इमारतीतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच पालक यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे.

अक्षराज
२ बुलडाणा, मंगळवार, दि.०१ जुलै २०२५ विविधा

## संपादकीय

### कांदा खरेदीचा वांधा!

भारतीयांच्या 'किचन'मध्ये जीवनावश्यक बनलेला कांदा आणि वाद हे समीकरण अलीकडच्या काळात अधिक घट्ट होताना दिसते. हंगाम शेतीचा असो वा निवडणुकीचा, कांदा येनकेन प्रकारे चर्चेत असतो, मग विषय दरांतील वाढीचा असो वा घसरणीचा! मागणी-पुरवठ्याचे गणित बिघडून उत्पादक आणि कधीकधी सरकारही या कात्रीत सापडत असते. सामान्य ग्राहक त्यात भरडला गेला की अधिक गहजब होतो. या खेपेला केंद्राच्या बहुचर्चित खरेदी धोरणातील निकष आणि कमी दर निश्चितीमुळे उत्पादक संतप्त झाले आहेत.

लोकसभा निवडणुकीत हरित पट्ट्यात फटका बसल्यानंतर केंद्राने राज्याच्या विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान चूक सुधारली. कांदा निर्यातीला चाल देणारे काही निर्णय घेतले. निर्यात शुल्क, मूल्य हटविले. प्रत्यक्षात त्याचा फायदा शेतकऱ्याला झाला काय, हा संशोधनाचा मुद्दा. बफर स्टॉकसाठी खुल्या बाजारातून खरेदीचे आश्वासन तेव्हा उत्पादकांना दिले गेले. अखेर विलंबाने का होईना नाफेड आणि 'एनसीसीएफ' या संस्थांच्या माध्यमातून तीन लाख टनाची कांदा खरेदी सुरू झाली; परंतु प्रत्यक्षात अटी-शर्तींच्या जंत्रींत अडकली. प्रतवारीचे निकष कठोर झाले. खरेदीचा दर बाजारसमित्यांपेक्षा दोनशे ते तीनशे रुपयांनी कमी निश्चित झाला, ज्यामुळे नुकसान होत असल्याचा उत्पादकांचा दावा आहे. सध्या चांगल्या कांद्याला लिलावात दोन हजार ते बावीसशे रुपयांचा दर मिळतो. सरकारी खरेदीचा दर मात्र १४३५ रुपये ठरला. त्यातून उत्पादन खर्चही निघत नाही. पूर्वी खरेदीचे दर स्थानिक पातळीवर निश्चित व्हायचे. परंतु, आता ते केंद्राच्या ग्राहक व्यवहार विभागाच्या सुचनांनुसार ठरत असल्याने ही तफावत झाल्याचे निरीक्षण अभ्यासक नोंदवतात.

बाजारातील कांद्याचा अतिरिक्त साठा उचलून दर नियंत्रणात ठेवणे आणि शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे, हा खरेदीचा मुख्य उद्देश. परंतु, खरेदीच्या ठरलेल्या कमी दरांमुळे बाजारातील कांदाही कोसळतो की काय, अशी स्थिती आहे. वास्तविक यंदा नाशिक जिल्ह्यात कांद्याचे उत्पादन ६३ टक्क्यांनी वाढले. विक्रमी साठ लाख टनांपर्यंत ते पोहोचले, जे गेल्या वर्षीपेक्षा जवळपास दुप्पट आहे. मे महिन्यातील पावसाने पाचदहा टक्के नासाडी झाल्यानंतरही बम्पर पीक आले. अडीच लाख हेक्टवर क्षेत्र लागवडीखाली आहे. त्या तुलनेत सरकारी खरेदी अगदीच किरकोळ. साठवणुकीची सुविधाही अवघी पंचवीस टक्के!

व्यापाऱ्यांकडील कांदा खरेदी करून तो प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडील दाखवून कोट्यवधी रुपये मधल्या साखळीने लाटले. हे प्रकरण चौकशीच्या पातळीवर आहे. अशा स्थितीत पुन्हा त्याचीच पुनरावृत्ती होत असूनही यंत्रणांचे 'हाताची घडी, तोंडावर बोट' आहे. उत्पादन अधिक असल्याने सरकारला कांदा खरेदी करायची नाही, तर केवळ तसे भासवायचे आहे, असे दिसते. सरकारने खरेदीचे दर स्पर्धात्मक ठेवावेत आणि निकष शिथिल करून प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, असा आग्रह शेतकरी संघटनांनी धरला आहे. 'धरलं तर चावतंय अन् सोडलं तर पळतंय' अशी कांदा प्रश्नावर सरकारची अवस्था होते. उत्पादकांना मात्र धरसोडीच्या निर्णयांऐवजी सुसंगत धोरणे आणि आधाराची गरज वाटते. कांद्याचे दर आणखी काही महिने जेमतेम राहतील. परंतु, अतिपावसाने खरिपात पिकाचे नुकसान झाल्यास दिवाळीनंतर चित्र पलटू शकते. तेव्हा मात्र सरकारला उत्पादकांचे स्मरण होईल. खरेदीच्या दरांत शेदोनशे रुपयांची वाढ केल्यास तूर्तास तिढा सुटू शकतो. ग्राहकांनाही केवळ बघ्याची भूमिका घेता येणार नाही. उत्पादकांना, ग्राहकांचा पाठिंबा दिसून आल्यास दोन्ही घटक जवळ येऊ शकतात. यंत्रणांवर दबाव वाढू शकतो. कृत्रिम बुद्धिमत्तेसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत क्रांती घडवून आणायच्या गप्पा सरकार करते. दुसऱ्या बाजूला कृषी धोरणांत कमालीचा विरोधाभास दिसतो. हे दुटप्पी वागणे परवडणारे नाही. 'गरज सरो वैद्य मरो,' ही वृत्ती थांबत नाही, तोवर शेती व शेतीवर गुजराण असणाऱ्यांचे प्रश्न सुटणे कठीणच!

# हातभर समस्येचं बोटभर उत्तर!

आपल्या आजूबाजूला अनेक समस्या, प्रश्न आ वासून उभे राहिलेले दिसून येतात. हवेचे प्रदूषण वाढले आहे, ओझोन वायूचा थर विरळ होत आहे, अन्नसाखळी विस्कळीत झाली आहे. अशा अनेक पर्यावरणीय समस्या सजीव सृष्टीसमोर उभ्या ठाकल्या आहेत. अमेरिकेची दादागिरी, इस्रायलचा युद्धखोरीपणा, रशियाचा हेकटपणा, चीनची फसवाफसवी यांसारख्या आंतरराष्ट्रीय राजकारणामुळे अनेक देश गरिबी, मागासलेपणा आणि भुकेमुळे त्रस्त आहेत. दहशतवाद, अणुशस्त्र स्पर्धा आणि वाढत्या कुरबुरीमुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.

फक्त आपल्या देशाच्या विचार केला तरी दहशतवाद, नक्षलवाद, जातीय व धार्मिक दंगे यामुळे अनेक वेळा काही भागांतील जनजीवन विस्कळीत होते. गाव असो की शहर, लोकांना दैनंदिन जीवनात पाणीपुरवठा, वीज समस्या आणि वाहतुकीतील अडथळे अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. वैयक्तिक जीवनातही आपण सतत अडचणींचा सामना करत असतो. एक प्रश्न सुटतो न सुटतो तोच दुसरा तयार होतो. समस्या मागून समस्या सोडवत पुढे जाणे हेच जीवनाचे खरे सूत्र असते.

काही समस्या मात्र कनभर असतात, परंतु आपण त्या मनभर सम जून बसतो. डोकं शांत ठेवून एखादी समस्या हाताळली, तर आपल्याला योग्य आणि सकारात्मक उत्तर मिळते. कुलूप मोठं असलं, तरी त्याची चावी लहान असते; त्याचप्रमाणेच समस्या मोठी वाटत असली, तरी त्यावरील उपाय फार छोटासा असतो. एखाद्या गंभीर आजारावर दररोज घेतलेल्या छोट्याशा गोळीनेही मात करता येते. समाजात असणाऱ्या प्रत्येक समस्येला समर्पक पर्याय असतो. प्रत्येक समस्या सोडवता येते, फक्त त्यासाठी लागणारी इच्छाशक्ती महत्त्वाची असते. निवडणुकांपूर्वी देशातील, राज्यातील, शहर किंवा गावातील प्रश्नांचा मागोवा घेतला जातो. प्रत्येक पक्ष व त्यांचे उमेदवार हे प्रश्न सोडवण्याची आश्वासने देतात. अशा काळात मतदार म्हणून आपण त्यांच्या भूमिकेचा विचार



केला पाहिजे. त्यांच्या वर्तनात, कार्यक्रमात आणि विचारधारेत या प्रश्नांची तळमळ किती आहे, हे तपासले पाहिजे. देशातील आणि परिसरातील समस्या आणि प्रश्नांची उत्तरे आपण मतदान यंत्रावरील बटन 'बोटाने' दाबून शोधतो. याचा अर्थ असा की हातभर प्रश्नांचे उत्तर बोटभर असते. आपण लोकप्रतिनिधीची निवड किती चांगल्या पद्धतीने करतो, यावरून भविष्यकाळातील अनेक समस्या सुटू शकतात आणि सध्याच्या समस्यांचे निराकरण होऊ शकते.

एखादा पूल कोसळतो, काही लोक मृत्युमुखी पडतात; त्यानंतर सर्व देशभरातील पूलांचे ऑडिट सुरू होते. एखाद्या मोठ्या इमारतीला आग लागते, मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि वित्तहानी होते, आणि मग हॉस्पिटल्स व शासकीय इमारतींचे फायर ऑडिट सुरू होते. महिलांच्या बाबतीत एखादी दुर्दैवी घटना घडते आणि त्यानंतर अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून फर्मान निघतात.

'प्रतिबंध हाच उपाय' या पद्धतीने आपण वैयक्तिक आणि सामूहिक जीवनात विचार करत नाही. काही लोकांना प्राण गमवावे लागतात, प्रचंड त्रास सहन करावा लागतो, तेव्हा कुठे उपाययोजना केल्या जातात. एखाद्या चौकात वारंवार अपघात होतात, आणि जीवितहानी होते, मग प्रशासनाच्या लक्षात येते की इथे स्पीड ब्रेकर हवा होता. पण तो स्पीड ब्रेकर काही लोकांचे हातपाय मोडल्यानंतर किंवा प्राण गेल्यानंतर बसवला जातो. तोच स्पीड ब्रेकर वेळेवर बसवला असता, तर अनेकांचे प्राण वाचले असतेही हळहळ फक्त संवेदनशील व्यक्तींनाच वाटते.खरंतर स्पीड ब्रेकर हे वेगाने येणाऱ्या वाहनांना थोपवण्यासाठीचे बोटभर उत्तर असते. पण वेळेवर सुचत नाही, म्हणून दुर्दैवी घटना घडतात.

'फ्युज' हे घरगुती वीज वापरातील एक अत्यंत महत्त्वाचे सुरक्षा उपकरण आहे. विद्युत प्रवाह मर्यादेपेक्षा जास्त झाला, तर फ्युज वितळतो आणि वीजपुरवठा बंद होतो. त्यामुळे आग लागणे, उपकरणांचे नुकसान किंवा विजेचा धक्का लागण्याची शक्यता टळते. याचाच अर्थ असा की बोटभर असणारे फ्युज हे हातभर असणाऱ्या समस्येवर उपाय ठरते.

दोन व्यक्तींमधील किंवा गटांमधील वादांवरही बोटभर उत्तर असते. पण काही लोक जाणीवपूर्वक वाद वाढवत असतात. मालमत्तेसाठीचे तंटे असोत किंवा प्रतिष्ठेसंदर्भातील वाद असोतसामोपचाराने आणि सुसंवादातून ते सोडवता येतात. अशा वेळी दोघांनी समोरासमोर बसून चर्चा करणे आवश्यक असते. म्हणजेच दोन व्यक्तींमधील किंवा दोन देशांतील वाद हे बोटभर ' चर्चा ' या शब्दातून मिटवले जाऊ शकतात. युद्ध, रक्तपात, निरपराधांची हत्या, वित्तहानी आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांचे होणारे नुकसान यांसारख्या हातभर गंभीर समस्यां चर्चेमुळे उद्भवूच शकत नाही.

म्हणूनच माझे मत आहे की, हातभर समस्यांवर बोटभर उत्तर शोधण्याचा आपण सातत्याने प्रयत्न केला पाहिजे. असे उत्तर नक्कीच सापडते...

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## २१ व्या जागतिक पोलिस व अग्निशमन स्पर्धेमध्ये शुभांगीला कांस्य पदक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, पनवेल :** महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील डॅशिंग महिला कर्मचारी शुभांगी संतोष घुले यांना अमेरिका येथील अल्बामा येथे नुकत्याच संपन्न झालेल्या २१ व्या जागतिक पोलिस व अग्निशमन स्पर्धेमध्ये कांस्य पदक मिळाले आहे. उत्तुंग अशा या यशाबद्दल मनपाचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी शुभांगी यांचे विशेष अभिनंदन केले.

अल्बामा, अमेरिका येथे शुभांगी संतोष घुले यांनी भारत देशाच्या संघात सहभागी होऊन २०२५ च्या २१ व्या जागतिक पोलिस व अग्निशमन स्पर्धेत अल्टिमेट फायर फायटिंग चॅलेंज या खेळात कांस्य पदक मिळवून भारताचे नाव पुन्हा एकदा उज्ज्वल केले.

या स्पर्धेतील तिचा हा पराक्रम देशाच्या क्रीडा क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. अल्बामा येथे २०२५ मध्ये झालेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत, जगातील अग्निशमन आणि पोलिस दलांचे उत्कृष्ट संघ सहभागी झाले होते. ही स्पर्धा अग्निशमन, पोलिस दल आणि बचाव कार्यातील व्यावसायिक कौशल्यांची चाचणी घेणारी होती. यात जगभरातून ५० देश सहभागी झाले होते. शुभांगी यांनी इतर देशांच्या स्पर्धकांशी सामना करत, या कठीण आणि तडफदार स्पर्धेत आपला जलद आणि



उत्कृष्ट कामगिरीचा दाखला देत कांस्य पदक प्राप्त केले.

याआधी एप्रिल महिन्यात नवी दिल्ली येथे त्यागराज स्टेडियमवरती झालेल्या ऑल इंडिया नॅशनल फायर सर्व्हिस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्डाच्या वतीने थर्ड इडिएशन ऑफ ऑल इंडिया फायर सर्व्हिसेस स्पोर्ट्स अॅन्ड फायर सर्व्हिसेस मीट २०२५ मध्ये झालेल्या थाळीफेक व गोळा फेक या दोन्ही खेळामध्ये अग्निशामक शुभांगी संतोष घुले यांनी सुवर्ण पदक मिळवले होते.

या दैदिप्यमान कामगिरीबद्दल अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे तसेच महानगरपालिकेचे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी शुभांगी यांचे अभिनंदन केले आहे.

### डॉक्टर..

बनले रोगाचे घर
सारे आमचे शरीर
शिंक येता जराशी
लगेचं हवा डॉक्टर

इलाज हवा तत्पर
रोग सरावा सत्वर
वेळ आहे कुणाला
इन्सटंट ते भराभर

विकत घेतला जणूं
पैसे फेकून डॉक्टर
चुकता तो जरासा
मारायलागतो खेटर

मनही होई आजारी
कसू शरीरा बरोबर
मिळेलं कुठे सांगावे
औषध या रोगावर

रोगी चुकून दगावता
पहा मग रूद्रावतार
हाण मार जाळपोळ
क्रौर्यदावे आविष्कार

बीले वाढवून मागता
करता श्रध्दाअपहार
मेडीक्लेमचा फायदा
मिळे स्वादिष्टउपहार

डॉक्टरदिन शुभेच्छा
आता देतो भारंभार
अर्थ हीन शुभचिंतन
का शाब्दिक आभार

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो

१ जुलै हा हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा जन्मदिन. त्यांच्या जन्मदिनानिमीत्त १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही तो कृषी दीन म्हणून संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा केला गेला. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला गेला.

शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घराघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी



ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषिदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत. आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो - लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेलती जात नाही. कर्जाच्या बोझ्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो. महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत. आजच्या कृषी दिवसाच्या निमित्ताने तमाम शेतकरी बांधवांना कृषिदिनाच्या शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## सावनेर राकाँपातर्फे सुप्रिया सुळे यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३०, नागपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या(शरदचंद्र पवार) कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांच्या नागपूर भेटीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सावनेर विधानसभा प्रमुख अमरचंद जैन यांनी तालुक्यातील विविध मुद्द्यावर सुप्रियाताईशी सविस्तर चर्चा करून तालुक्यातील शिक्षित,अशिक्षित व प्रशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळावा



तसेच शेतकऱ्यांना जर दुबार पेरणी करावी लागली तर त्यांना शासनाकडून मिळणारे अनुदान दुप्पट मिळावे, दहावी पास झालेल्या विद्यार्थ्यांचा अकराव्या वर्गात रखडलेला ऑनलाइन प्रवेश तात्काळ सुरू करावा आदी विविध मागण्यांचे लेखी निवेदन देण्यात आले. याप्रसंगी तालुका अध्यक्ष कपिल वानखेडे, खापरखेडा शहर अध्यक्ष यशवंत बारापात्रे, विनोद गोडबोले, चेतन जावरकर, मंगेश चोरपगार, आदित्य पाटील, रोहन इंगोले आदीसह तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मित्रांसोबत पोहायला गेला अन करून अंत झाला



**अक्षराज : विनायक भोईर**

**दि.२९, बोईसर (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील बोईसर तालुक्यातील ढेकाळे गावात एक दुर्दैवी घटना घडली आहे. रविवार दि.२९ जून २०२५ रोजी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास वांद्री धरण ढेकाळे येथे आपल्या मित्रांसोबत अनिकेत रामतीरथ गुप्ता वय २२ वर्ष, राहणार जोगेश्वरी मुंबई वेस्ट, हा वांद्री धरण पोहण्यासाठी आला असताना पाण्यात बुडून या युवकाचा दुर्दैवी अंत झाला आहे. सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाच्या वतीने व गावकऱ्यांच्या मदतीने या युवकाच्या मृतदेहाला बाहेर काढण्यात आले. या घटनेमुळे ढेकाळे गावात शोककळा पसरली आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंगची आनंद वारी



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.३०, खंडाळा :** दि.३० जून २०२५ जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग च्या मुलांची दिंडी सोहळा चालली पंढरीला जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग येथुन गावामध्ये मुलांची दिंडी सोहळा चे आयोजन केले होते. लहानशी मुले मृदुंग भजन म्हणत टाळ वाजवत रस्त्यानी निघाली तेव्हा गावातील ग्रामस्थ लहान वारकर्यांकडे पाहून पाहतच राहीली. तसेच गावातील महिलांनी व ग्रामस्थांनी दिंडीचे स्वागत केले.

भैरवनाथ मंदिरात मुलांना खाऊ वाटप केला दिंडीमध्ये पालकवर्ग सहभागी झाले होते पालक आणि लहान मुले यांनी फुगड्या खेळल्या. सदर कार्यक्रमाला गावातील सर्व ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन कमिटी उपस्थित होते. जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंगच्या मुख्याध्यापक नलिनी वंजारी सहकारी शिक्षक दत्तात्रय महांगरे, उषा यादव, केदारनाथ नांदे यांनी दिंडीचे आयोजन केले होते.

## पावसाची दडी; कोरड्या आभाळाकडे शेतकऱ्यांचे डोळे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** मे महिन्यात मान्सूनपूर्व पाऊस झाल्याने यंदा पावसाळा चांगला राहील, अशी आशा होती, मात्र मृग नक्षत्रात पावसाने दडी मारली. अल्प पावसावर काही शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या होत्या. त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची शक्यता असून, मागील वीस दिवसांपासून पावसाने उघडीप दिली आहे. यामुळे पेरण्या खोळंबल्या आहेत. रासायनिक खते व बी -बियाणे शेतकऱ्यांना खरेदी केली असून अनेकांना कर्ज काढून खरेदी करावी लागली आहे. आता पावसासाठी आभाळाकडे डोळे लागले आहेत.

यंदा पेरणीचे नियोजन करून शेतकऱ्यांकडून शेतीची पूर्व मशागत करून शेती पेरणीयोग्य तयार करण्यात आली आहे. अनेक शेतकऱ्यांनी पाऊस वेळेवर येईल या आशेने खते,बी -बियाणे खरेदी करून ठेवले आहेत. जिल्ह्यातील शेतकरी अगदी एप्रिल व मे महिन्यापासून कामाला लागले. उन्हाळी मशागतीची कामे सुरू करण्यापूर्वीच अवकाळी पाऊस बरसला. या पावसाने वेळेत उन्हाळी मशागतीची कामे करत आली नाहीत. हजारो हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामातील पिके घेतल्यापासून जैसे थे स्थिती आहे. अवकाळी पाऊस झाल्याने मशागतीची कामे करणे कठीण झाले. त्यामुळे यंदा पेरण्यांना कालावधी लागला. माळरानावर मशागतीची कामे करून शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या.

मे महिन्यात जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने चांगलेच थैमान घातले होते. त्यानंतर जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पावसाने जोर धरला होता. मात्र, मागील वीस दिवसांपासून पावसाने दडी दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या थांबविल्या आहेत. काळ्या जमिनीत वापसा नसल्याने व मशागती अभावी अद्याप अनेक शेतकऱ्यांना पेरण्या करता आल्या नाहीत. गेल्या आठवडाभरापासून सकाळ आणि संध्याकाळ ढगाळ वातावरण तर दिवसभर स्वच्छ सूर्यप्रकाश व सुसाट वारा वाहत आहे. यामुळे जमिनीतील ओलावाही कमी होत आहे. ऐन पावसाळ्यात पावसाने दीर्घ दडी मारली असून पावसासाठी शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत.

## संघटनेला मिळणार नवे बळ : आ.किशोर जोरगेवार

### भाजप मंडळ अध्यक्षपदाच्या नियुक्त्या जाहीर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगरातील विविध मंडळ अध्यक्ष पदाच्या नियुक्त्या अधिकृतपणे जाहीर करण्यात आल्या आहेत. मुंबई येथे आयोजित विशेष बैठकीत या नावांवर अंतिम निर्णय घेण्यात आला. प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेत ही बैठक पार पडली.

या बैठकीला प्रदेश महामंत्री माधवी नाईक, विदर्भ संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, आ. किशोर जोरगेवार, भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, माजी शहर अध्यक्ष दशरथसिंह ठाकूर आदींची उपस्थिती होती. या बैठकीत आ. किशोर जोरगेवार यांच्या सूचनेनुसार महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार यांनी महामंडळ अध्यक्ष पदाकरीता दिलेल्या नावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांचा अनुभव, पक्षनिष्ठा, संघटन कौशल्य, यावर आधारित विचार करुन या नावांना प्रदेश नेतृत्वाकडून मान्यता देण्यात आली. या नियुक्त्यांमध्ये तुकुम मंडळासाठी स्वप्नील डूकरे, बाजार वार्ड मंडळासाठी सुभाष अदमाने, सिव्हिल लाईन मंडळासाठी रवी जोगी, बाबूपेठ मंडळासाठी प्रदिप किरमे, बंगाली कॅम्प मंडळासाठी अॅड. सारिका संदूरकर तसेच चंद्रपूर ग्रामीणसाठी विनोद खेवले यांची निवड करण्यात आली आहे.

या नवीन नियुक्त्यांमुळे भारतीय जनता पार्टीच्या महानगर संघटनेला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. प्रत्येक मंडळात भाजपाचा विचार पोहोचविणे, पक्षाचे ध्येयकार्य जनतेपर्यंत नेणे आणि संघटना मजबूत करणे हे या नव्या अध्यक्षांचे महत्वाचे काम असेल. महानगरातील भाजप संघटना अधिक सक्षम करण्यासाठी नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. कार्यकर्त्यांचा सन्मान, जबाबदारी वाटप आणि संघटन विस्तार हे भाजपचे वैशिष्ट्य आहे. ही नियुक्ती म्हणजे संघटनात्मक बांधणीची एक महत्वाची पायरी आहे. सर्व मंडळ अध्यक्षांनी आपल्या कार्यक्षेत्रात संघटना वाढवावी. जनतेच्या समस्या ऐकून त्या सोडविण्यासाठी पक्षातर्फे प्रयत्न करावेत आणि भाजपाचा विचार शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवावा असे आ. किशोर जोरगेवार यांनी म्हटले.

# बल्लारपूरचे नाव देशात मोठे करा, आई-वडिलांना विसरू नका !



## आ.सुधीर मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, बल्लारपूर (चंद्रपूर) :** विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होण्यात त्यांचा स्वतःचा फायदा आहेच, पण बल्लारपूरचाही मोठा फायदा आहे. आपल्या भागातील एखादा विद्यार्थी किंवा एखाद्या विद्यार्थीनीचे राज्यभर, देशभर कौतुक होते, तेव्हा बल्लारपूरचे आणि येथील लोकांचेही कौतुक होत असते. माझ्या बल्लारपुरातील विद्यार्थ्यांनी देशात नावलौकीक प्राप्त करावा. त्याचवेळी ज्या आई-वडिलांनी संघर्षातून आपल्याला मोठं केलं, त्यांचाही विसर पडू देऊ नका, या शब्दांत राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. बल्लारपूर येथे आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते चंदनसिंग चंदेल, भाजपचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भाजपच्या महामंत्री संध्याताई गुरनुले, भाजपचे महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे, रणंजय सिंग, निलेश खरबडे, वैशाली जोशी, नम्रता आचार्य, रेणुका दुधे, देवा वाटकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. ते म्हणाले, 'स्वतःसाठी, स्वतःच्या परिवारासाठी नाही तर माझ्या गावासाठी, जिल्हा आणि देशासाठी मी मेहनत करेन, हा भाव ठेवून भविष्य घडविणे महत्त्वाचे आहे. शिक्षणाचे महत्त्व खूप आहे. त्यामुळे जिल्ह्यात शिक्षणाच्या संधी वाढाव्यात यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील असतो. चंद्रपूर येथे वैद्यकीय महाविद्यालय आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, बल्लारपूर येथे एस. एन. डी.टी. विद्यापीठाचे केंद्र मंजूर केले.

सोमनाथ (मुल) येथे भव्य कृषी महाविद्यालय उभारले जात आहे. आता मुल येथे शासकीय पॉलिटेक्निक कॉलेजसाठी मंजुरी मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, तसेच बल्लारपूर येथे सुषमा स्वराज स्किल डेव्हलपमेंट सेंटरचे उद्घाटन लवकरच होणार आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय आणि डॉ. बाबा आमटे अभ्यासिका उपयुक्त ठरत आहेत. यामागे आपल्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घ्यावी आणि जिल्ह्याचे नाव देशभरात गौरवाने घेतले जावे, याच उद्देशाने हे सर्व प्रयत्न सुरू आहेत.' एसएनडिटीमध्ये ६२ अभ्यासक्रम सुरू होतील, तेव्हा या जिल्ह्यातील माझ्या बहिणींच्या कौशल्यांसाठी आकाश मोकळे होणार आहे. स्व. सुषमा स्वराज स्किल सेंटरच्या माध्यमातून आणखी एक दालन मोकळे करून दिले आहे. शिक्षणावर फक्त श्रीमंताचा अधिकार असू नये. उलट ज्यांच्या मनामध्ये शिक्षणाची ज्योत प्रज्ज्वलित करण्याची गरज आहे, त्या परिवारांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, हा उद्देश आहे असेही ते म्हणाले.

शिक्षण हे स्वैराचारी असता कामा नये, ते संस्कारी असले पाहिजे. खूप शिकल्यावरही आई-वडिलांचा परिचय करून देताना लाज वाटत असेल तर काहीच उपयोग नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, 'माणूस द्या मज माणूस द्या'. शिक्षणाचा अर्थ माणुसकी जोपासणारा नसेल, तर त्या शिक्षणाचा फक्त धनप्राप्तीसाठी उपयोग होईल. आत्मविश्वास जागवावा लागेल. त्यातूनच पुढचा मार्ग सुकर होणार आहे. पैसा महत्त्वाचा आहे, पण सर्वस्व नाही. मन निराश न ठेवता जगातील उत्तमोत्तम ज्ञान कसे आत्मसात करता येईल, याचा सातत्याने विचार करा. कोणत्याही युगात शिक्षणाचे महत्त्व कायमच राहिले आहेत. म्हणूनच घरावरील नेमप्लेटवर नावाखाली शिक्षणाचाच उल्लेख असतो. आपल्या संपत्तीचा नसतो. शिक्षण हे धनापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. शिक्षण हा सर्वाधिक मिरवण्याचा अलंकार आहे, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले. आत्मविश्वासासोबत संधीकडेही बारकाईने लक्ष ठेवावे लागेल. आयुष्यात मोठं व्हायचं असेल तर संधी सोडायची नाही. कोणत्या दिशेने जावे, असे प्रश्न तुमच्या मनात निर्माण झाले असतील. त्यासाठी आपल्यातील क्षमता, गुण, दोष कागदावर लिहून काढले पाहिजे. जगात परिपूर्ण कुणीच नाही. प्रत्येकात काहीतरी दोष आहेत. १४७ गुणदोष आहेत, असं स्व. श्रीकांत जिचकार म्हणायचे. प्रत्येकात एवढे गुणदोष असणे शक्यच नाही. त्यामुळे लिहून काढा, त्याचा करियर निवडताना फायदा होईल. स्वतःसाठी जगणे हा शिक्षणाचा अर्थ नाही. शिक्षण घेताना आई-वडिलांची सेवा करायचीच आहे. पण भारतमातेचाही विचार करा. देशासाठी मोठे व्हायचे आहे, हा विचार करा. ज्या देशाने मला सर्व दिलं, त्या देशासाठी मी देखील काहीतरी करू शकतो, असाही भाव मनात ठेवण्याचा सल्ला आ. मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांना दिला.

***प्रत्येक कामात परफेक्शन ठेवा***

जपानमध्ये एखाद्या उत्पादनाची गुणवत्ता एका टक्क्याने देखील कमी असेल तर ते उत्पादन रद्द केले जाते. शंभर टक्के उत्तम गुणवत्ता तिथे अनिवार्य आहे. त्यामुळेच जापान जगात सर्वात पुढे आहेत. एवढे परफेक्शन आपल्या कामामध्ये असले पाहिजे. एखादे बीज लावताना ते छोटेसे रोपटे असते. पण ते मोठे झाल्यावर तुम्ही तोडू शकत नाही. त्यामुळे भविष्यातील इच्छेचे बिजारोपण करा, रोज परिश्रमाचे पाणी टाका. तुमच्या मनातील इच्छेचा वृक्ष एवढा मोठा होईल, की तुमच्या ज्ञानाचा प्रकाश समाजालाही मिळेल, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले.

***'योग, ध्यान करा; रोज डायरी लिहा'***

मोठे होण्यासाठी छोटी छोटी कामे करा. योग करा, ध्यान करा. सात तास झोप घ्या. जरा विश्रांती घेऊन एखादं सुंदर गाणं ऐकलं पाहिजे. एकावेळी एकच काम करायचे. मेंदूला ताजेतवाने ठेवायचे असेल तर रोज डायरी लिहा. एक पान रोज प्रत्येकाने लिहायचेच आहे. मनात येईल, तो विचार लिहून ठेवा. त्यातून सकारात्मकता निर्माण होते. मोठे होण्यासाठी आई-वडिलांच्या सेवा करा, त्यांचा आदर करा.

***'तर बल्बचा शोध लागलाच नसता'***

१८५० ते ५५ चा काळ होता. शाळेतून मिळालेले पत्र मुलाने आईला दिले. आई पत्र वाचताना रडायला लागली. थॉमस अल्वा एडिसनने विचारले, या पत्रात असं काय आहे. आई म्हणाली, तुझ्या शिक्षिकेने लिहिले आहे की, 'तुमचा मुलगा एवढा हुशार आहे की, इतर मुलांसोबत शिकवताना अडचण जात आहे. तुम्ही याला घरीच शिकवा.' आईने घरीच शिकवायला सुरुवात केली. त्याला रसायनशास्त्रात खूप रस होता. पण संघर्ष कमी नव्हता. भाजी विकली, पेपर टाकले. त्याचा एक कानही निकामी झाला. मात्र जिद्द सोडली नाही. आज एडिसनच्या नावावर एक हजार पेटंट आहेत. बल्बचा शोधही त्यानेच लावला. खूप मोठा झाल्यावर एक दिवस त्याला ते जुने पत्र सापडले. त्यात लिहिले होते, 'तुमचा मुलगा वर्गातील सर्वात ढ विद्यार्थी आहे. त्याला शिकवताना अडचणी येतात. इतर विद्यार्थी बिघडण्याची शक्यता आहे.' त्याच्या डोळ्यातील पाणी थांबत नव्हते, ही कथा सांगून आ. श्री. मुनगंटीवार यांनी 'कोशीश करने वालों की कभी हार नहीं होती' ही कविता विद्यार्थ्यांपुढे वाचली.

# अनधिकृत फेरीवाल्यांविरोधातील कारवाईला टाळाटाळ ; न्यायालयीन आदेशांची खुलेआम पायमल्ली



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, दिवा (ठाणे) :** दिवा विभागातील सार्वजनिक रस्ते, फूटपाथ, बाजारपेठा आणि मुख्य चौकांमध्ये दिवसेंदिवस वाढणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे नागरिकांचे जीवन असह्य झाले आहे. वाहतुकीस अडथळा, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आणि सार्वजनिक सुव्यवस्थेचा पूर्ण बिघाड – यामुळे दिव्यातील जनतेत तीव्र असंतोष पसरला आहे.

या गंभीर समस्येबाबत ठाणे महानगरपालिका, दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांना पूर्वीच निवेदनाद्वारे माहिती देण्यात आली होती. मात्र आजतागायत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होतो आहे. यासंदर्भात मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश स्पष्टपणे सांगतात की, सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमण हे बेकायदेशीर असून, अशा प्रकारावर तत्काळ कारवाई होणे आवश्यक आहे. परंतु प्रशासनाची दुर्लक्ष व अनास्थेची भूमिका ही न्यायालयाच्या आदेशाचा सरळसरळ अवमान (Contempt of Court) ठरते.

भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १६६ नुसार, सरकारी अधिकारी जर आपल्यावर असलेली कायदेशीर जबाबदारी पार पाडण्यात अयशस्वी ठरले, तर त्यांच्यावर फौजदारी कारवाई होऊ शकते. शिवाय, Contempt of Courts Act, १९७१ अंतर्गत संबंधित अधिकाऱ्यांवर न्यायालयीन अवमानाची कारवाईही शक्य आहे. असे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे. त्यामुळे, नागरिकांच्या वतीने सहाय्यक आयुक्त यांना अंतिम इशारा देण्यात आला आहे की, ७ दिवसांच्या आत कारवाई करून लेखी अहवाल द्यावा, अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष न्यायालयात थेट दाद मागतील. दिव्यातील कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी, नागरी सुविधांचा न्याय्य उपयोग होण्यासाठी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होण्यासाठी तत्काळ व ठोस कारवाई होणे अत्यावश्यक आहे. यावेळी निवेदन देताना कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे, दिवा महिला शहर संघटिका ज्योती पाटील, विभाग प्रमुख रवी रसाळ,योगेश निकम, संजय जाधव, नागेश पवार, उपविभाग प्रमुख संदीप राऊत, शाखाप्रमुख प्रफुल्ल पाष्टे,शाखा संघटिका सुहासिनी गुळेकर तसेच महिला व पुरुष पदाधिकारी उपस्थित होते.

# एकविरा आईच्या दर्शनासाठी ७ जुलै पासून ड्रेस कोड लागू : प्रमुख विश्वस्त खा. सुरेश म्हात्रे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, भिवंडी :** आगरी कोळी बांधवांसह लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या कार्ला येथील एकविरा आईच्या दर्शनासाठी अंग प्रदर्शन करणाऱ्या कपड्यांवर बंदी घालण्यात आली आहे. एकविरा आईचे व मंदिराचे पावित्र्य राखण्यासाठी हि बंदी घालण्यात आली असून ड्रेस कोड संदर्भातील नव्या नियमांची अंमलबजावणी ७ जुलै पासून करण्यात येणार असल्याची माहिती कार्ला एकविरा आई ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी दिली आहे. शुक्रवारी कार्ला येथे आई एकविरा देवीच्या मंदिरात विश्वस्थ मंडळाच्या बैठकीत एकमताने ड्रेस कोड संदर्भात हा ठराव मंजूर करण्यात आला असल्याची माहिती खासदार बाळ्या मामा यांनी दिली आहे.



कार्ला येथील एकविरा आई हि लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असून राज्यासह देशातील अनेक ठिकाणाहून भक्त देवीच्या दर्शनाला येत असतात. मात्र काही भक्त अंग प्रदर्शन करणारे कपडे घालून देवीचे दर्शन घेण्यासाठी येतात. त्यामुळे देवीचे व मंदिराचे पावित्र्य धोक्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी विश्वस्थ मंडळाकडे आल्या असून अनेक भक्तांनी सोशल मिडयाद्वारे ड्रेस कोड संदर्भात मागणी केली केली होती. भक्तांच्या मागणीनुसार विश्वस्थ मंडळाच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत याविषयी निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती खासदार बाळ्या मामा यांनी दिली आहे.

**कोणत्या कपड्यांना बंदी**

शॉर्ट, मिनी स्कर्ट, वेस्टर्न कपडे, मिनीस्कर्ट, फाटक्या जीन्स, हाफ पँट व अंग प्रदर्शन करणाऱ्या कपड्यांना बंदी घालण्यात आली आहे.

**कोणते कपडे घालावेत**

**महिला व मुलींनी :** साडी, सलवार कुर्ता, किंवा इतर भारतीय पारंपरिक कपडे घालावेत ज्याने पूर्ण अंग झाकलेले असावे.

**पुरुषांनी व मुलांनी :** धोतर, कुर्ता पायजमा, पँट शर्ट, टी शर्ट व इतर पारंपरिक कपडे ज्याने पूर्ण अंग झाकलेले असावे.

# महायुतीच्या घटकपक्षांना न्याय देणे ही माझी नैतिक जबाबदारी : आमदार दाते

## तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत वाघदरा रस्ता कामाचे भुमिपूजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या सर्वच घटकपक्षांनी मला निवडून आणण्यासाठी सामुहिक प्रयत्न केल्याची मला जाणीव असून त्या सर्वांना सामावून घेत सर्वांच्या राजकीय इच्छा आकांक्षांना समान न्याय देणे ही महायुतीचा जबाबदार घटक म्हणुन माझी नैतिक जबाबदारी असल्याचे मत पारनेर-नगरचे आमदार काशिनाथ दाते यांनी तालुक्यातील कासारे येथिल वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत कासारे ते वाघदरा रस्ता काम रु. १० लक्षभुमिपूजन व गोवर्धन तथा धनंजय निमसे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सामुहिक कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना मांडले.

कासारे ते वाघदरा रस्ता कामाचे भुमि पूजन झाल्यानंतर बिरोबा देवस्थानच्या सभामंडपात धनंजय निमसे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना आमदार दाते म्हणाले कि, निश्चितपणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती एकत्रितपणे लढवेल, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे आरक्षण जाहीर होणे बाकी आहे.

महायुतीच्या घटक पक्षांच्या वाटाघाटी नेमक्या कशा होतील हे खात्रिशीर रित्या सांगता येत नाही. शिवाय इच्छुकांची संख्या ही भरपूर आहे, त्यामुळे आजच एखाद्या कार्यकर्त्याच्या उमेदवारीबद्दल बोलण संयुक्तिक नाही. समविचारी कार्यकर्त्यांनी कुठल्याही अटी-शर्ती शिवाय महायुतीच्या घटकपक्षांची प्रथमतः प्रवेश करावा. पुढे बोलताना त्यांनी सांगितले कि, आजपर्यंतच्या राजकीय वाटचालीत भुषविलेल्या विविध राजकीय पदांच्या माध्यमातून कासारे गावासाठी सातत्याने निधी देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला असून आज भूमिपूजन केलेल्या १० लक्ष रुपयांच्या कासारे ते वाघदरा रस्ता कामासाठी पुढील काळात अधिकच निधी देवून काम लवकरच पूर्ण करण्यात येईल.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, भाजपचे मंडलाध्यक्ष राहुल शिंदे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बाबासाहेब खिलारी, दुध संघाचे चेअरमन दत्ता नाना पवार, सरपंच पंकज कारखिले, शिवसेना उपतालुकाध्यक्ष पंढरीनाथ उंडे, धनंजय निमसे, बबनराव झावरे, देवराम मगर, जयश्री घोलप, सरपंच सुनिता मुळे, सरपंच शिवाजी निमसे, अक्षय गोरडे, शुभम टेकुडे, अमोल रोकडे, विकास रोकडे, धोंडिभाऊ दातीर, गोपिनाथ घुले यांसह कासारे परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यकर्त्यांनी कुठल्याही एका ठराविक पदासाठी किंवा उमेदवारीसाठी अडून न राहता ज्याला उमेदवारी मिळेल त्याच्यासोबत एकसंघपणे उभं राहील पाहिजे. येणाऱ्या काळात प्रत्येकाचं राजकीय व सामाजिक योगदान बघून विविध संस्थावर संधी देत योग्य सन्मान राखला जाईल, त्यामुळे कुणीही नाउमेद होऊ नये किवा नाउमेद करण्याचा माझा हेतूही नाही.

**- आमदार काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

# पत्रकारांना बरोबर घेऊनच विकास साधता येईल - मुख्याधिकारी रोकडे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३०, पंढरपूर :** मराठी पत्रकार संघ पुणे महाराष्ट्र राज्य आयोजित पंढरपूर पत्रकार पदाधिकारी पद ग्रहण सोहळा पंढरपूर येथील पत्रकार भवन मध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना पंढरपूर नगरपालिका नूतन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी पंढरपूर शहर विकासाबाबत माहिती दिली. आषाढी वारीच नव्हे तर चारही वाऱ्या व नित्य येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा कशा देता येतील. यासाठी सर्व पत्रकार सहकाऱ्यांना बरोबर घेऊनच कार्य करणार असल्याचे प्रतिपादन केले. तसेच अनेक वर्षे रेंगाळत असलेला पत्रकार गृहनिर्माण प्रश्न लवकरच बैठक घेऊन मार्गी लावण्याची ग्वाही ही त्यांनी दिली.

सदर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मराठी पत्रकार संघाचे किरण जोशी यांनी पुढील वर्षांपर्यंत आपल्या सर्व बांधवांच्या घरांची पायाभरणी झालेली असेल त्यासाठी शासन स्तरावर येणाऱ्या सर्व अडचणी सोडवून संघ भावना जागृत ठेवण्याचे सूतोवाच केले. पत्रकार व त्याच्या कुटुंब यांना सर्व मोफत उपचारासाठी पुणे येथे संपन्न दवाखान्यात सोय करणार असल्याची माहिती दिली.

यावेळी जेष्ठ पत्रकार महेश खिस्ते यांनी उपस्थित नवोदित पत्रकारांना पत्रकारिता हे व्रत आहे ते टिकवणे काळाची गरज आहे असे मार्गदर्शन केले. यावेळी मराठी पत्रकार संघाचे सचिव शिबु नायर, महाराष्ट्र प्रदेश सचिव हरिभाऊ प्रक्षाळे, पुणे जिल्हा अध्यक्ष पंकज बिबवे उपस्थित होते.

नूतन शहर अध्यक्ष पदी दिनेश खंडेलवाल, शहर सहअध्यक्ष विनोद पोतदार, उपाध्यक्षपदी नवनाथ खिलारे, सचिवपदी अपराजित सर्वगोड तरणतालुका अध्यक्षपदी मिलिंद यादव तर उपाध्यक्षपदी अमोल कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली. सर्व पदाधिकारी ओळखपत्रे वाटप करण्यात आली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक हरिभाऊ यांनी केले तर सुत्रसंचलन अमोल कुलकर्णी यांनी केले. यावेळी अध्यक्ष संजय कोकरे, सहसचिव विकास पवार, राजेंद्र ढवळे, अविनाश उत्पात, ज्ञानेश्वर शिंदे, अविनाश साळुंखे, डांगे, विकास सरवळे, महालिंग दुधाळे, बालम मुलाणी, राजू बाबर, सावता जाधव, वनसाळे, दत्ताजीराव पाटील, अमोल माने, सचिन माने, राजेश शिंदे, बिडकर, सागर आतकरे, कमलीवाले, कबीर देवकुळे, अमोल गुरव, आदी सह पत्रकार बांधव उपस्थित होते. सर्व नूतन पदाधिकारी यांची लवकरच बैठक होऊन पुढील वाटचाल ठरवण्यात येणार आहे.

# ठाण्याच्या सिव्हिल रुग्णालयात यशस्वी झाली प्लॅस्टिक सर्जरी; गरजू रुग्णांना मिळणार मोठा दिलासा

**अक्षराज : संजय पंडित**

**दि. ३०, ठाणे :** जन्मजात हातापायाची बोट चिकटल्यावर भविष्यात त्याचा त्रास होण्याचा संभव जास्त असतो. यावर वेळेत शस्त्रक्रिया करणे महत्वाचे असले तरी चिकटलेल्या बोटांची शस्त्रक्रिया करून त्यांची प्लॅस्टिक सर्जरी करणे खुप खर्चिक असते. परंतु सर्वसामान्यांसाठी अशी शस्त्रक्रिया आता सिव्हिल रुग्णालयात होत असून नुकतीच रुग्णालयात भिवंडीतील एका चिमुकलीच्या यशस्वी प्लॅस्टिक सर्जरीनंतर तिच्या डाव्या हाताची दोन चिकटलेली बोटं आता स्वतंत्रपणे हालचाल करू लागणार आहेत. भिवंडी परिसरात राहणारी अंजू ही मुलगी ६ वर्षांची असून तिच्या दोन्ही हाताची मधले आणि बाजूच बोटं आणि पायाची करंगळी आणि बाजूचे बोट जन्मतः च चिकटलेली होती. त्यामुळे ती लेखन, खेळ, वस्तू उचलणे यासारख्या मूलभूत हालचालीही अडथळा ठरत होती . तिच्या या स्थितीमुळे आईवडील चिंतेत होते, पण उपचारांचा खर्च परवडत नव्हता. अशा जन्मजात दोषांवर वेळेवर शस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक असते. अंजूच्या पालकांनी ठाण्यातील सिव्हिल रुग्णालयाचा पर्याय निवडला.



जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली अंजूच्या डाव्या हातावर नुकतीच यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आल्याची माहिती प्लॅस्टिक सर्जन डॉ.अभिषेक धाकड यांनी दिली. साधारण एक तासांच्या सर्जरीनंतर मधले व बाजूचे चिकटलेले बोटं वेगळी करण्यात यश आले आहे. मुलीच्या हाताची हालचाल सुधारण्यास सुरुवात झाली आहे. डॉक्टरांनी सांगितले की, पुढील काळात योग्य फिजिओथेरपी आणि काळजी घेतल्यास ती बोटं पूर्णतः कार्यक्षम होतील. या शस्त्रक्रियेसाठी वरिष्ठ सर्जन डॉ. निशिकांत रोकडे, प्लॅस्टिक सर्जन डॉ.अभिषेक धाकड, भूल तज्ज्ञ डॉ.प्रियांका महांगडे, प्रीती पगारे, भक्ती प्रिठे आदींनीअथक परिश्रम घेतले.सामान्यतः अशा प्लॅस्टिक सर्जरी खासगी रुग्णालयांमध्ये मोठा खर्च येतो. त्यामुळे अनेक गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबे अशा उपचारांपासून वंचित राहतात. पण आता सिव्हिल रुग्णालयांमध्येही अशा जटिल व खर्चिक सर्जरी मोफत होऊ लागल्यामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे डॉ.कैलास पवार यांनी सांगितलं आहे

# पाटण तालुक्यात प्रांत, तहसिल कार्यालयात कमालीचा निरुत्साह

## कर्मचाऱ्यांकडून सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी - पालक वेठीस

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.३०, पाटण (सातारा) :** महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गतिमान प्रशासन अभियान सुरू केले आहे. फडणवीस सरकारच्या १५० दिवसांच्या कारभाराचा हा महत्त्वाचा भाग असून, प्रशासकीय प्रक्रिया पारदर्शक, जलद आणि लोकाभिमुख करणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नागरिकांना शासकीय योजनांचा त्वरित लाभ मिळावा, तक्रार निवारण प्रभावी व्हावे आणि प्रशासनात कार्यक्षमता यावी.

यासाठी हे अभियान राबवले जात आहे. मात्र, पाटण तालुक्यातील तहसिलदार कार्यालयात कर्मचारी पातळीवर कमालीचा निरुत्साह दिसून येत आहे. याचा फटका सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थ्यांना बसत आहे. प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसिलदार अनंत गुरव यांनी तालुका पातळीवर महसूल विभागातील प्रशासन गतिमान करण्यासाठी प्रशंसनीय पावले उचलली आहेत. स्वतः विविध ठिकाणी भेटी देऊन परिस्थितीचा आढावा घेत आहेत. महसूल रेकॉर्ड अद्ययावत ठेवण्याबरोबरच सुविथांबाबतच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याचा प्रयत्न करत आहेत. शंभर दिवसांचा कार्यक्रम लावून वारस नोंदी, ए.कु.म्या कमी करणे, तुकडा नोंद कमी करणे, अपाक नोंद मुक्त गाव, पानंदमुक्त अभियान, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले वेळेवर देण्याचा कार्यक्रम यासारखे उपक्रम त्यांनी हाती घेतले आहेत. या प्रयत्नांमुळे प्रांत, तहसिल, सर्कल, तलाठी, सेतू कार्यालयातील प्रशासनात सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. मात्र, कारकुनी पातळीवरील अडथळे यामुळे प्रभावित होत आहेत. प्रांताधिकारी, तहसीलदार यांच्या गतिमान प्रशासन करण्याच्या कार्याला खो घालण्याचा केवीलवाणा प्रकार खुद्द कार्यालयातीलच काही अधिकारी व कर्मचारी करत असल्याचे निदर्शनास येत आहे. प्रशासनातील पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी कठोर उपाययोजना आवश्यक आहेत. अन्यथा, गतिमान प्रशासनाचे उद्दिष्ट केवळ कागदावरच राहील. या समस्येकडे जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# थोडक्यात

## रविंद्र राजदेव यांच्या संकल्पनेतून गारगुंडीत रेशन कार्ड कॅम्प

### निलेश लंके प्रतिष्ठानचा अभिनव उपक्रम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील विविध गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून खासदार निलेश लंके प्रतिष्ठान च्या वतीने टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटात अहिल्यानगरचे लोकप्रिय खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष तथा माजी सरपंच रविंद्र राजदेव यांच्या संकल्पनेतून रेशनकार्ड व बांधकाम कामगार कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. आज गारगुंडी येथील ग्रामस्थांसाठी देखील कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पचे उद्घाटन निलेश लंके प्रतिष्ठान मुंबईचे सोशल मिडिया प्रमुख बाळासाहेब ठुबे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. तसेच यावेळी राष्ट्रवादीचे नेते दिपक अण्णा लंके यांनी देखील भेट दिली. यावेळी अंकुशराव ठूबे, सोपान ठुबे, गुलाब शेख, दौलत वसंत फापाळे, निवृत्ती झावरे, आप्पासाहेब ठुबे, गोकुळ फापाळे, सरलाबाई फापाळे, सुमन फापाळे, उषा गिरी, तलाठी गुंजाळ, ग्रामसेवक जाधव भाऊसाहेब आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते .

दरम्यान टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील विविध गावांमध्ये आपली सेवा आपल्याच दारी हा अभिनव उपक्रम सुरू आहे. या उपक्रमासाठी सर्वसामान्य जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. गावोगावी कॅम्पला चांगला प्रतिसाद मिळत आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी रविंद्र राजदेव यांच्या संकल्पनेतून रेशनकार्ड कॅम्प अतिशय उत्साहात सुरू आहे. सर्वसामान्य नागरिकांचे पारनेरला जायचे हेलपाटे या कॅम्प मुळे वाचले आहे. या कॅम्पमध्ये रेशनकार्ड ऑनलाईन करणे, आधारकार्ड अपडेट करणे, बांधकाम कामगार कार्ड काढणे, नवीन मतदार नोंदणी करणे, रेशनकार्ड वरील नाव कमी करणे व दुरूस्ती करणे आदी कामे मोफत करून दिली जाणार आहे. माजी सरपंच रविंद्र राजदेव यांनी प्रत्येक गावात कॅम्पचे आयोजन करून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच या कॅम्पमध्ये एकाच ठिकाणी सर्व योजनांची कामे करून मिळणार आहे.

## अहिल्यानगरमधून आषाढी वारीसाठी ४०० जादा एस.टी बस



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी दिनांक २ जुलै ते १३ जुलै दरम्यान एस.टी महामंडळाकडून नगर जिल्ह्यातून एकूण ४०० एसटी बसेस रवाना केल्या जाणार आहेत. त्यामध्ये नगर विभागाच्या २५०, धुळे विभागाकडून ७५ व जळगाव विभागाच्या ७४ एसटी बसचा समावेश. सर्व एस.टी बस तारकपूर बस स्थानकावरून सुटतील, असे महामंडळाचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांनी सांगितले.

याशिवाय प्रत्येक गावातून मागणी आल्यास गावातून पंढरपूरला जाण्यासाठी व पंढरपूरहून गावात येण्यासाठी थेट बस उपलब्ध करून देण्यात येईल. त्यासाठी गावापासूनचे भाडे आकारण्यात येईल, असेही एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले.

आषाढी वारीसाठी भाविकांच्या दृष्टीने २ जुलै, सप्तमी (आषाढी यात्रेची सुरुवात), ३ जुलै अष्टमी, ४ जुलै, नवमी (रिंगण सोहळा), ५ जुलै (दशमी), ६ जुलै, एकादशी (मुख्य दिवस) व १० जुलै, पौर्णिमा असे महत्त्वपूर्ण दिवस आहेत. यासाठी संबंधित आगारप्रमुखांची यात्राप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. स्थानक प्रमुख त्यांना त्यासाठी मदत करतील. शेवगाव, पाथर्डी, जामखेड, श्रीगोंदा, आगाराच्या बसेस माहीजळगाव मार्गे पंढरपूरकडे जातील. पंढरपूर येथे विठ्ठल कारखाना यात्रा केंद्रावर शेड क्रमांक ३ मध्ये नगर विभागाची शेड असणार आहे. माहीजळगाव येथे महामंडळाने बस बिघाड दुरुस्ती पथक ठेवले आहे. तारकपूर आगारातून ४०, शेवगाव २०, जामखेडमधून १८, पारनेर आगारातून १६, श्रीरामपूर २३, कोपरगाव ३०, संगमनेर २५, श्रीगोंदा ३०, नेवासा १६, पाथर्डी २० व अकोले १३ अशा एकूण २५० बस पंढरपूरसाठी जादा सोडण्यात येणार आहेत.

## महाराष्ट्राच्या मुली राष्ट्रीय कबड्डीच्या उपांत्यपूर्व फेरीत दाखल



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.३०, मुंबई :** महाराष्ट्राच्या मुलींनी १ल्या १८वर्षाखालील मुले व मुलींच्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला. प्रेमनगर आश्रम, राणीपूर जवळ, हरिद्वार, उत्तर प्रदेश येथे सुरू असलेल्या मुलींच्या उप उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राच्या मुलींनी मध्य प्रदेशचा ३४-१४ असा पाडाव केला. झंझावाती सुरुवात करीत पूर्वार्धात २६-०८ अशी आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने उत्तरार्धात सावध खेळ करीत विजयाला गवसणी घातली. सेरेना म्हस्करचा अष्टपैलू खेळ तिला संतोषी थोरवेची मिळालेली चढाईची तर सानिका वाकसे, पूजा चिंदरकर यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे सहज शक्य झाले. मध्य प्रदेशचा प्रतिकार अत्यंत दुबळा ठरला. या अगोदर झालेल्या 'इ' गटातील साखळीतील शेवटच्या सामन्यात महाराष्ट्राने छत्तीसगडचा प्रतिकार ४५-३४ असा मोडून काढला. विश्रांतीला महाराष्ट्र १९-२२ अशा ०३ गुणांनी पिछाडीवर होते. विश्रांतीनंतर महाराष्ट्राने टॉप गिअर टाकत सामना आपल्या बाजूने झुकविला. सेरेना म्हसकर, बिदिशा सोनार, सानिका वाकसे यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. महाराष्ट्राने गटात प्रथम क्रमांक मिळवित बाद फेरी गाठली. महाराष्ट्राच्या मुलांना इ गटातील शेवटच्या साखळी सामन्यात दिल्ली कडून २७-३७ असा १० गुणांनी पराभव पत्करावा लागला. पण या गटात उपविजेते म्हणून महाराष्ट्राने बाद फेरी गाठली.